# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१५ / चैत्र १७, १९३७ ( शके )**

**(१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(२) परिवहन मंत्री**
**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १६**

---

**साताऱ्यातील खंडोबा यात्रेतील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना मदत देण्याबाबत**

**(१) * २८४६ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साताऱ्यातील खंडोबा यात्रेत हत्ती बिथरुन दोन महिलांचा मृत्यु व दोन जण जखमी झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाच प्रकारे मांढरदेवी यात्रेच्या दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जण मृत व जखमी झाल्याच्या घटनेची चौकशी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींपैकी कोणकोणत्या शिफारशींवर शासनाने आतापर्यंत अंमलबजावणी केली आहे,

(३) राज्यात अनेक देवस्थानांच्या ठिकाणी नेहमीच मोठमोठया यात्रा भरत असून अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच साताऱ्यातील खंडोबा यात्रेत मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे

(५) अद्याप कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

खंडोबा देवाच्या यात्रेत हत्ती स्वत: भवती जागेवर फिरुन खाली बसण्याच्या प्रयत्नात हत्तीच्या पायाचा धक्का लागल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्यात यात्रांचे नियोजन आणि करावयाच्या उपाययोजना यासाठी राज्य शासनाने शासन परिपत्रक क्र.आरएलएफ २००९/प्र.क्र.५८/म-३, दिनांक २३.०३.२००९ व २६.०३.२००९ च्या परिपत्रकांन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने सर्व जिल्हाधिका-यांकडून त्यांच्या जिल्ह्यातील यात्रांकरीता यात्रेच्या कालावधीत विविध खात्यांनी पार पाडावयाच्या जबाबदा-यांसाठी प्रमाणित कार्यपध्दती (Standing operating Procedure) निश्चित करण्यात येते. त्यानुषंगाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा व प्रमाणित कार्यपध्दतीस अनुसरुन उपाययोजना व अंमलबजावणी करणेबाबत जिल्हाधिका-यांकडून सूचना निर्गमित करण्यात येतात.

(४) व (५) खंडोबा देवस्थान पाल, यात्रा कालावधीत संबंधित भाविकांना तात्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. एका मृत महिलेच्या नातेवाईकांना मार्तंड देवस्थान ट्रस्ट, कमिटी पाल यांचेकडून रु.१.५१ लाखाची मदत देण्यात आलेली आहे.

-----------------

**सीमा शुल्क आकारणी नाका, दापचरी (ता.तलासरी, जि.पालघर) येथून अवजड वाहनांची चोरट्या मार्गाने होत असलेली वाहतुक**

**(२) * ४०७१ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिमा शुल्क आकारणी दापचरी नाका (ता.तलासरी, जि.पालघर) येथून रोज किमान ४०० ते ५०० अवजड वाहनांची चोरट्या मार्गाने वाहतूक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिमा शुल्क आकारणी करीत असलेली सदभाव कंपनीचे अधिकारी व स्थानिक पोलीस विभागाचे (आर.टी.ओ.) अधिकारी यांच्या संगनमताने रोज मोठ्या प्रमाणावर रक्कमेचा अपहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व अशा प्रकारे शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूलाचा अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) तपासणी नाक्यावरुन अधिका-यांची नजर चूकवून काही वाहने पळून जातात असे निदर्शनास आल्यामुळे सीमा तपासणी नाका, दापचेरी येथे वाहनांची नियमित तपासणी केली जाते.

दि. १४.०१.२०१५ रोजी तपासणी नाका चुकवून व बॅरिकेटस् मोडून वाहन पळवून नेल्या प्रकरणी वाहन मालकाविरुध्द तलासरी, पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परतवाडा (जि.अमरावती) येथील मेळघाटातील रोजंदारी करणा-या मजूरांसाठी बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर करू दिला जात नसल्याबाबत**

**(३) * ४४४० श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) येथील मेळघाटातील रोजगार संपल्यानंतर निवाऱ्यासाठी मजूरांकरिता बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर त्यांना करू दिला जात नसल्याने या मजूरांना उघड्यावर रात्र काढावी लागत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजंदारी करणा-या मजूरांना सदरहू भवनाचा रात्री राहण्यासाठी वापर करू देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन इमारत, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे तत्कालीन लोकप्रतिनिधींच्या सूचनेवरुन आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत "मेळघाट आदिवासी लोकांकरीता औद्योगिक भवन" म्हणून बांधण्यात आली असून सदर इमारत मेळघाट येथील मजूरांच्या रात्रीच्या निवाऱ्याकरीता बांधण्यात आली नाही. तसेच सदर इमारतीचा वापर उक्त हेतूकरिता करू देण्याबाबत मागणी/निवेदन जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. सदर इमारतीचा वापर मागील लोकसभा व विधानसभेच्या सार्वजनिक निवडणूकांच्या कालावधीत साहित्य ठेवण्यासाठी व इतर प्रशासकीय कामकाजासाठी करण्यात आला आहे. निवडणूकविषयक साहित्य अजूनही सदर ठिकाणी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्याठिकाणी मजूरांना रात्रीच्या निवाऱ्याची सोय करणे शक्य नाही.

-----------------

**मडूरा व पाडलेस, (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील बागायतीला लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणेबाबत**

**(४) * ४७१० श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मडूरा व पाडलेस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील कोकण रेल्वे स्टेशन जवळील बागायतीला जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यानच्या दुसऱ्या आठवडयात लागलेल्या भीषण आगीत ३० एकर क्षेत्रातील हजारो काजू व आंबा कलमे जळून सुमारे ५० लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याची धक्कादायक घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांचे आगीत नुकसान झाले त्यांना कोणती नुकसान भरपाई देण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप मदत देण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मडुरा व पाडलोस गावामध्ये दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी आकस्मिक आग लागून एकूण ४.४५ हेक्टर क्षेत्रात काजूची ४२० झाडे जळून अंदाजे रुपये ४.२० लक्ष चे नुकसान झाले आहे.

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या निकषानुसार आग लागून शेती अथवा फळ पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही. यास्तव वरीलप्रमाणे फळबागांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत देता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जैतापुर प्रकल्पाचे रेंगाळलेले काम मार्गी लावण्याबाबत**

**(५) * ४८८७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापुर प्रकल्पाबाबत सरकारमध्ये मतभेद असल्यामुळे सदर प्रकल्पाच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे रेंगाळलेले काम मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) प्रकल्पाच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होऊन जमिनीचा ताबा न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मुक्त विद्यापीठांमार्फत घेण्यात आलेल्या पदवीधारकांना नोकरीची संधी आणि पदोन्नती नाकारली जात असल्याबाबत

**(६) * ५३०० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१८ ला दिनांक २३ डिसेंबर,२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुक्त विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या पदवीधारकांना नोकरीची संधी आणि पदोन्नती नाकारली जात असल्याच्या पार्श्वभुमीवर राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु यांची बैठक आयोजित करून तद्संबंधीचा अहवाल डिसेंबर, २०१४ पर्यंत शासनास सादर करण्याच्या सुचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्संबंधीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, अहवालात नमुद मुख्य बाबींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) मुक्त विद्यापीठाची शासनमान्य पदवी अग्राह्य धरण्याचे नेमके कारण काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) अद्याप अहवाल प्राप्त झालेला नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय

(२) चारही कृषि विद्यापीठांतील कार्यरत कृषि सहाय्यकांना (मुक्त विद्यापीठांच्या पदवीधारकांसहित) कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नियमानुसार पदोन्नती देण्याबाबत विचार होण्यास हरकत नसल्याचे दि. २०.१२.२०१४ रोजी महासंचालक, कृषि परिषद, पुणे यांचे दालनात राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु यांच्यात झालेल्या बैठकीतील अहवालात नमूद केले आहे. तसेच कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर पदोन्नती/निवड होण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे, १९९०/शासन निर्णय/परिपत्रक/सुचना/ नियमानुसार आवश्यक ती शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणे बंधनकारक राहील असे मत व्यक्त केले आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाचा दि. १२.१२.२००६ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनेनुसार अध्यापकीय पदे वगळून इतर पदांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवीका/पदवी पात्र ठरविलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यात बोगस क्रमांक व कागदपत्रे बनवून मोठ्या प्रमाणात वाहनांचा वापर होत असल्याबाबत

**(७) * ५७४१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यात बोगस क्रमांकाची वाहने जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्क्रॅप झालेली वाहने विकत घ्यायची त्यावर बोगस क्रमांक आणि बोगस कागदपत्रे बनवून त्यांचा सर्रास वापर करण्याचा प्रकार विदर्भात मोठ्या प्रमाणात सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) वर्धा जिल्ह्यात अशी बाब निदर्शनास आली आहे. तथापि, चंद्रपूर जिल्ह्यात असे आढळून आले नाही.

(२) नाही.

(३) व (४) वर्धा जिल्ह्यात बनावट सांगाडा (चेसिस) क्रमांक असलेल्या मोटार वाहन क्रमांक CG-०४G- ६३७४ च्या वाहन मालकाविरुध्द दि. ६.१.२०१५ रोजी सेवाग्राम पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०६/१५ भा.दं.वि. कलम ४२०,४८६,४७१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सदर प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांचेकडून त्यांच्या कार्यालयीन तपासणी पथकास अशी वाहने आढळून आल्यास कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) बसस्थानक परिसरात घाण व कच-यामुळे बसस्थानकाची झालेली दुरवस्था

**(८) * ५९४८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बस स्थानक परिसराला घाण, कचरा व त्यामुळे पसरणा-या दुर्गंधीमुळे बस स्थानकाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बस स्थानकाच्या आवारात नव्हे तर फलाटवरही घाण कचरा साचलेला असतो त्यामुळे मोकाट गायी, शेळया, डुकरे आदि प्राण्यांच्या दिवसभर सर्वत्र मुक्त वावर असतो. मोकाट जनावरे सहज स्थानकालगतच शिरुन दोन फलाटातील मोकळया जागेत प्रवाशानी सांडलेले खाद्यपदार्थ खात फिरतात, स्थानकातील मोकळया जागेला उकीरडयाचे स्वरुप प्राप्त झाले असून परिसरातील व्यवसायीक सर्रासपणे घाण, कचरा आणुन टाकतात असे असूनही याबाबत आवश्यक कारवाई करण्यात येत नसल्याने सदरहू बस स्थानकाची दुरवस्था झाली असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सिल्लोड बसस्थानकाच्या समोरच्या जागेची स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली दैनंदिन केली जाते. बसस्थानकाचा पाठीमागील भाग दैनंदिन वापरात नाही. त्या ठिकाणी बाहेरील फळवाले, हॉटेलवाले व इतर त्यांचा कचरा रात्रीच्या वेळी आणून टाकतात. याबाबत विभाग नियंत्रक, औरंगाबाद व आगार व्यवस्थापक सिल्लोड यांच्यामार्फत पोलिस स्टेशन व नगरपालिकेकडे तक्रार देण्यात आलेली आहे.

सिल्लोड बसस्थानकाचा वापर समोरच्या बाजूने आहे. तेथील दैनंदिन स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली केली जाते. तसेच सदर बसस्थानकाची साफसफाई कंत्राटीपध्दतीने करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून निविदा मंजूरीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दत्तात्रय संस्थान, शिखर माहूर (जि.नांदेड) यांच्या मालकीच्या जमीनी अन्य व्यक्तीच्या नावे बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याबाबत**

**(९) * ६२८० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दत्तात्रय संस्थान, शिखर माहूर (जि.नांदेड) यांच्या मालकीच्या इनाम जमिनी अन्य व्यक्तीच्या नावे हस्तांतरीत झाल्याबाबत चौकशीसाठी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक १० मार्च, २०१४ रोजी समिती गठीत केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५ सदस्यीय समितीला आपला अहवाल पंधरा दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी समितीने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष कोणते,
(४) नसल्यास, चौकशीसाठी झालेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत,
(५) उक्त देवस्थानाच्या मालकीच्या इनाम जमीनी बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याप्रकरणी दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन विषयासंदर्भात जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी उपविभागीय अधिकारी, यवतमाळ/वणी/केळापूर/उमरखेड/दाराव्हा यांच्या अधिपत्याखाली ५ चौकशी पथके दि.३०/३/२०१३, दि.१/७/२०१३ व दि.१०/३/२०१४ रोजीच्या आदेशान्वये गठित केली आहेत. सदर चौकशी पथकांना त्यांचा अहवाल १५ दिवसांच्या कालावधीत सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. तथापि काही पथकांच्या अध्यक्ष पदावरील व्यक्तींच्या बदल्यामुळे तसेच लोकसभेच्या व विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे सदर पथकांनी विलंबाने दि.३०/१/२०१५ ते दि.२३/३/२०१५ या कालावधीत त्यांचे अहवाल सादर केले आहेत.

सदर चौकशी अहवालात दत्तात्रय संस्थान, शिखर माहूर, जि.नांदेड यांच्या मालकीच्या जमिनींच्या संदर्भात यवतमाळ उपविभागात बेकायदेशीर हस्तांतरणाची प्रकरणे आढळली नाहीत. मात्र दारव्हा, वणी, उमरखेड व केळापूर उपविभागात सदर देवस्थानच्या काही जमिनीविषयी विनापरवाना हस्तांतरणाचे व्यवहार झाल्याचे तर काही जमिनींच्या अधिकार अभिलेखात इतर हक्कात कुळांची नावे घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) व (६) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी उप विभागीय अधिकारी, वणी, उमरखेड, केळापूर व दारव्हा यांना त्यांच्या अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

-----------------

**कराड तालुक्यातील (जि.सातारा) खाण मालक व महसुल विभागातील अधिकारी संगणमताने करीत असलेला गैरव्यवहार**

**(१०) * ६३४३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यात पूर्व व पश्चिमेकडील पट्टयात सह्याद्री पर्वत रांगेचे डोंगर विस्तारले असून या डोंगर भागात १०० च्या आसपास दगड खाणी असून या दगड खाणीच्या माध्यमातून डोंगर मोठ्या प्रमाणात पोखरुन तेथील दगड, मुरुम मोठ्या प्रमाणात उचलला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील महसुल विभागांचे अधिकारी सदर खाणीच्या मालकांकडून रॉयल्टीचा प्रति ब्रॉस २०० रुपये ही रॉयल्टी शासनास जमा केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागात मोठ्या प्रमाणात खाणी सुरु असून तेथील दगड, माती, मुरुम यांचा मोठ्या प्रमाणातील साठा तेथील खाण मालक तेथील महसुल विभागातील अधिका-यांना हाताशी धरुन गैरव्यवहार करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) कराड तालुक्यात २४ खनिपट्टे मंजूर असून, त्यामध्ये उत्खनन सुरु आहे. या खाणमालकांकडून प्रतिब्रास रुपये २००/- या प्रमाणे स्वामित्वधन वसूल करण्यात येत आहे.

(३) व (४) कराड तालुक्यात सन २०१४-२०१५ या वर्षात माती, मुरुम या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन / वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. अशा २५ प्रकरणात रुपये १,९४,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे, तथापि कराड तालुक्यातील खाण मालक महसूल विभागातील अधिका-यांना हाताशी धरुन गैरव्यवहार करत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मध्यप्रदेश व महाराष्ट्र सिमेवरील आर.टी.ओ. तपासणी नाक्यावरुन होणारी अवैध वाहतुक

**(११) * ६४३४ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाचा मध्यप्रदेश व महाराष्ट्र सिमेवरील मागील दोन वर्षापासून अमरावती शहरातील वरनड येथे सुरू असलेले आरटीओ तपासणी नाका नव्यानेच खाळा येथे अत्याधुनिक आरटीओ चेकपोस्टची निर्मिती झाल्यामुळे वरुडचे चेकपोस्ट खाळा येथे स्थलांतरीत झाले आहे. यामुळे वरुड शहरातून होणा-या अवैध वाहतूकीचे प्रमाण वाढले असून वाहन तपासणी नाका चुकवून सावनूर मार्गे ग्रामीण भागातून जड वाहतूक होत असल्याने दलालांचे अवैध व्यवहार सुरू झाले असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील दलालखोरी थांबविण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) याबाबत कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) रवाळा तपासणी नाका चुकवून वाहनांची होणारी वाहतूक रोखण्यासाठी अमरावती परिवहन कार्यालयाच्या भरारी पथकांमार्फत कारवाई करण्यात येते.

माहे एप्रिल-मे, २०१४ मध्ये रवाळा नाका चुकवून जाणा-या वाहनांची अमरावती परिवहन कार्यालयाच्या भरारी पथकाने तपासणी करुन दोषी आढळलेल्या ५० वाहन धारकांकडून रु. १.१५ लाख तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

तसेच, माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये भरारी पथकामार्फत राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत दोषी आढळलेल्या १८३ वाहनधारकाकडून रु. २.४२ लाख तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हायड्रोलिक ब्रेक कीटच्या धोरणानुसार ट्रॅक्टर व ट्रेलरचे पासिंग करणे बंद केल्याबाबत

**(१२) * ६५५७ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रात १ सप्टेंबर, २०१४ पासुन शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर व ट्रेलरचे हायड्रोलिक ब्रेक कीटच्या धोरणानुसार पासिंग करणे बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजारो शेतकऱ्यांनी खरेदी केलेली ट्रॅक्टर व ट्रेलर आज पासिंग विना थांबली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याचे कारण काय ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) केंद्र शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे ट्रॅक्टर व ट्रेलरसाठी दि. १.९.२०१४ पासून हायड्रोलिक ब्रेकिंग यंत्रणा सक्तीची करण्यात आली आहे. मात्र केंद्र शासनाच्या दि. २७.१.२०१५ च्या अधिसूचनेप्रमाणे ट्रेलरसाठी दिनांक १.१.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
हायड्रोलिक ब्रेकिंग सिस्टीमची सुविधा नसलेल्या ट्रॅक्टरची नोंदणी सध्या करण्यात येत नाही.
(३) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आगीमुळे नुकसान झालेल्या आंबा व काजू बागायतदारांना मदत मिळणेबाबत

**(१३) * ६५९५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोवा महामार्गावरील कपडगाव ते झरेवाडी दरम्यान दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लागलेल्या वणव्यात सुमारे ४०० एकर क्षेत्रातील आंबा, काजू, कलमांची हानी झाली असून १०० एकरमधील आंबा व ३०० एकर क्षेत्रातील काजू बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नुकसानीचे पंचनामे कर्मचा-यांच्या अभावामुळे पूर्ण झालेले नसल्याने शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या शेतक-यांना त्वरित नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मुंबई गोवा महामार्गावरील रत्नागिरी जिल्ह्यातील चरवेली, झरेवाडी या दोन गावात दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वणवा लागून फळपिकांचे नुकसान झाले आहे. सदर आगीचे पंचनामे करण्यात आले असून, त्यानुसार वणव्यामध्ये ६६ व्यक्तींच्या आंबा १६.१६ हेक्टर व काजूचे १७.५० हेक्टर असे एकूण ३३.६६ हेक्टर बागायतीचे नुकसान झाले आहे.

केंद्र शासनाच्या निकषानुसार वणवा लागून शेती अथवा फळ पिकाचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही. यास्तव वरीलप्रमाणे फळबागांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत देता येत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**राज्यात अपंग व ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या एस टी प्रवासातील सवलतीसाठी बनावट प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याबाबत**

**(१४) * ५७४३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अपंग व ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या एस टी प्रवासातील सवलतीचा फायदा उचलण्यासाठी अनेकजण बनावट प्रमाणपत्रांचा सर्रास वापर करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन अशा बनावट पासेसना आळा घालण्यासाठी स्मार्ट कार्ड सारखी योजना राबविणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) माहे जानेवारी २०१५ मध्ये रा.प. महामंडळाने आयोजित केलेल्या विशेष मार्गतपासणी मोहिमेत अपंग ८३३ व जेष्ठ नागरिक १६८० असे एकूण २५१३ एवढी बनावट ओळखपत्रे संपूर्ण महाराष्ट्रात आढळून आलेली आहेत. रा.प. महामंडळाकडून सध्या विद्यार्थी पास, मासिक व त्रैमासिक पास, आहिल्याबाई होळकर पास, मुंबई स्थित पत्रकार व आवडेल तेथे प्रवास योजना यांना स्मार्ट कार्ड योजना लागू करण्यात आलेली असून आतापर्यंत १३ लाख स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आलेले आहे. रा.प. महामंडळाकडून नवीन पुरवठादाराची नियुक्ती करुन जेष्ठ नागरिक, अपंग यांना स्मार्ट कार्ड देण्याची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**भुकंपग्रस्तांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५ टक्के राखीव जागा ठेवण्याबाबत**

**(१५) * ६४६४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन १९९४ व १९९५ मध्ये शासन निर्णय जारी करुन लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भुकंपग्रस्तांसाठी शासकीय नोक-यांमध्ये ५ टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील भुकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाने शासकीय नोक-यात जसे आरक्षण ठेवले तोच न्याय सातारा जिल्ह्यांतील पाटण तालुक्यातील कोयना धरण भुकंपग्रस्तांना लावण्यात यावा असा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये व त्यासुमारास दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) १९९५ मध्ये शासन निर्णयानुसार लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये ५ टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत.

(२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १२/०२/२०१५ चे निकालानुसार शासन निर्णय तीन महिन्यात लागु करावयाचा असुन त्याबाबत कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटीच्या बस चालक व वाहकांची रात्रपाळीला होणारी गैरसोय**

**(१६) * ६६०१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटीच्या बसचालक वाहकांना रात्रपाळीच्या वेळी अनेक गैरसोयीना सामोरे जावे लागत असतांना रात्रपाळीला त्यांना फक्त ७ रुपये मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एसटीच्या बसचालक व वाहकांना रात्रीच्या वेळी मुक्कामी ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यासह तसेच, रात्रपाळीच्या वेळी केलेल्या कामाच्या मोबदल्यात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) राज्य परिवहन महामंडळामार्फत ग्रामीण, अतिदुर्गम भाग तसेच शहरी ठिकाणी रात्रवस्ती मुक्कामाच्या फे-या चालविल्या जातात. यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या २५० आगारामध्ये चालक / वाहकांसाठी विश्रांती गृहांची तसेच स्वच्छता गृहांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच आगाराच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृहांची व्यवस्था व स्वच्छतागृहांची सोय करण्यात आलेली आहे. ग्रामीण मुक्कामांच्या फे-यांना राज्य परिवहन बसेसमध्ये सहा आसनी बाकाची चालक / वाहकांना झोपण्यासाठी व्यवस्था करण्यात येत आहे. मुक्कामाच्या ठिकाणी एक चालक व एक वाहक यांची मुक्कामाची सोय व प्रातर्विधीसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक ०९.०२.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातील शासकीय कार्यालये, उदा. ग्रामपंचायत कार्यालय, शासकीय शाळा इ. ठिकाणी चालक / वाहकांची सोय करण्याबाबत संबंधित यंत्रणांकडे पाठपूरावा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.